# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)
### जनसंपर्क विभाग

---

**हिवाळी-२०१८ परीक्षेकरीता माजी व बहिःशाल वर्गवारीतील विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारण्याबाबत सूचना (विलंब शुल्काबाबत सविस्तर माहिती)**

**अमरावती :**

सर्व सबंधितांचे माहिती करीता सुचित करण्यात येते की, हिवाळी - २०१८ परीक्षेकरीता प्रवेशित होऊ इच्छिणा-या व परीक्षेस पात्र असण-या माजी (अनुत्तीर्ण) वर्गवारीतील विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे आवश्यक शुल्कासह व विहित केलेल्या विलंब शुल्कासह स्वीकारून विद्यापीठात महाविद्यालयाने दिनांक २७ जुलै पर्यंत सादर करावयाची आहेत. त्यानंतर सदर विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे आवश्यक शुल्क अधिक विहीत केलेले प्रथम व द्वितीय टप्प्यातील विलंब शुल्क अधिक विहीत केलेल्या रू. ५०/- रु. प्रतिदिन याप्रमाणे महाविद्यालयाने दिनांक ३१ ऑगस्ट,२०१८ पर्यंत विद्यापीठात सादर करावयाची आहेत.

प्रथमच बहिःशाल वर्गवारीतील (महाविद्यालयामध्ये नियमित प्रवेश न घेता परीक्षा प्रवेशित होणारे) म्हणून प्रवेशित होऊ इच्छिणा-या व परीक्षेस पात्र असणा-या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे स्विकारण्याचा विद्यापीठ प्रशासनाने निर्णय घेतला असून सदर विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे आवश्यक शुल्क अधिक विहीत केलेले प्रथम व द्वितीय टप्प्यातील विलंब शुल्क अधिक विहीत केलेल्या रू. ५०/- रु. प्रतिदिन याप्रमाणे महाविद्यालयाने दिनांक ३१ ऑगस्ट,२०१८ पर्यंत विद्यापीठात सादर करावयाची आहेत.

सत्र २०१७-२०१८ पासून विद्यापीठाने सत्र व श्रेयांक पध्दती अभ्यासक्रम लागू केला असल्यामुळे विद्यार्थ्यांना या अभ्याक्रमांच्या परीक्षेला बहिःशाल म्हणून प्रवेशित होता येत नसल्यामुळे बहिःशाल म्हणून प्रवेशित होऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांकरीता अंतीम संधी विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहे.या संधीचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आव्हाण डॉ. एच.आर.देशमुख,संचालक,परीक्षा व मूल्यमापन मंडळ , संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती यांनी केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १९/०७/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी